**नि.फौ.ख.क्र.१०/२०१५**
सरकार – वि.- आरीफ शेख
**निशाणी क्र. ३१**

**सरकारतर्फे साक्षीदार क्र. २ -**
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नाव – पंकज प्रमोद मुळे - पोलीस साक्षीदार
वय – ३४ वर्षे, व्यवसाय – पो.ह., पोलीस अधिक्षक कार्यालय, लोहमार्ग विभाग, पुणे,
सध्या रा. - पिंपळे-गुरव, पुणे.

**फौजदारी प्रक्रीया संहितेचे कलम २९९ प्रमाणे, सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती पी.एस.काशीद यांचे मार्फत सुरु-**

सन २०१४ मध्ये मी स्थानीक गुन्हे अन्वेषण शाखा, लोहमार्ग पोलीस स्टेशन, पुणे येथे पोलीस शिपाई या पदावर कार्यरत होतो. दि. १९/०९/२०१४ रोजी माझी नेमणुक पुणे रेल्वे स्टेशन येथे गुन्हेगारांवर लक्ष ठेवण्याकरीता केलेली होती. माझे सोबत त्यावेळी पो.शि.राक्षे, पो.ना.गवारी, पो.ह. सोनवणे हे लोक होते. आम्हाला त्यावेळी एक इसम प्रवाशांचे खिसे तपासात असल्याचे आढळुन आले. आम्ही त्याची विचारपुस केली असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. आम्ही त्यास पोलीस स्टेशनला घेवुन आलो. त्याने चौकशीमध्ये कबुल केले की, १० ते १५ दिवसापुर्वीच्या लोकल ट्रेनमध्ये एका प्रवाशाचे पाकीट चोरले आहे. आरोपीने त्याचे नाव आरीफ शमशोद्दीन शेख असे सांगितले होते. आम्ही गुन्हयाचे रजिस्टर तपासले असता सदरचा गुन्हा हा गुन्हा क्र. १९४/२०१४ कलम ३७९ भा.दं.वि मधील असल्याचे निष्पन्न झाले. आम्ही त्यास अटक केली. त्याने आम्हास सांगितले की, सदरचा मुददेमाल राहते घरी ठेवलेला आहे.

२. आरोपीने केलेल्या निवेदनाप्रमाणे आम्ही सर्वजण त्याच्या घरी दापोडी येथे गेलो. त्याने त्याचे घरातील किचनमधुन १२००/- काढुन आम्हाला दिले. पोलीस नाईक गवारे साहेबांनी सदरचे पैसे जप्त करुन जप्ती पंचनामा तयार केला. संपुर्ण कार्यवाही माझे समक्ष झाली आहे. गवारे साहेबांनी माझा जबाब नोंदवला होता. आरोपीला पाहिल्यास मी ओळखु शकतो. आरोपी आज रोजी न्यायालयात हजर नाही.

**सरतपास पुर्ण.**

**आरोपी हा फरार असल्याने उलटतपास नाही.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

Digitally signed by CHAVAN NIKHIL JEEVANRAO
Date: 2026.01.21 17:38:56 +0530

**(एन.जे.चव्हाण)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
लोहमार्ग न्यायालय, पुणे.
दि. २१/०१/२०२६